यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade

अंतर्गत संज्ञापन पत्र / Internal Communication Sheet

**प्रेषक:** संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा

**विषय:** शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्रं.६४ दिनांक 09.04.2025 रोजी होणाऱ्या विद्वत परिषदेत ठेवण्यासाठी मान्यता मिळणेबाबत..

**प्रति:** मा. कुलगुरू

**दिनांक:** 08/04/2025

**संदर्भ:** य.च.म.मु.वि./सभा व दप्तर कक्ष/2025/132 दि. 07.04.2025

दिनांक 09.04.2025 रोजी होणाऱ्या विद्वत परिषदसाठी शिक्षणशास्त्र विद्याशाखा परीषद बैठक क्रमांक 64 चे इतिवृत मान्यतेसाठी आपणाकडे पाठवित असून कृपया मान्यता द्यावी, ही विनंती.

१) **विषय** - दि. 01.04.2025 रोजी आयोजित शिक्षणशास्त्र विद्याशाखा बैठक क्र. 64 चे इतिवृत्त मान्यता द्यावी, ही विनंती.

२) **विषय** -दिनांक 09.04.2025 रोजी होणाऱ्या विद्वत परिषदसाठी दि. 01.04.2025 रोजी झालेल्या शिक्षणशास्त्र विद्याशाखा परीषद क्रमांक 64 चे इतिवृत ठेवण्यास मान्यता मिळावी, ही विनंती.

**संचालक**
**शिक्षणशास्त्र विद्याशाखा**

**सोबत -संदर्भीय पत्र.**

परिशिष्ट 1 शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्रमांक ६४ चा इतिवृत अहवाल

मान्य
मान्य/ अमान्य
8/4/25

**मा. कुलगुरू**

मा. कुलगुरु कार्यालय
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
अंतर्गत आवक क्र.: VC/1021
दि. 8 / 4 /2025

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
## शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद क्र. ६४
## बैठक इतिवृत्त

---

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेची २०२५ या वर्षातील द्वितीय बैठक क्र. ६४ दि. ०१/०४/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. Offline आणि Online पध्दतीने आयोजित केली होती. सदर बैठकीस Online व Offline पद्धतीने उपस्थित सदस्यांची नावे खालीलप्रमाणे.

१. प्रा. संजिवनी महाले, संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, **अध्यक्ष**
२. डॉ. अमृत भारवाड, गुजरात विद्यापीठ, अहमदाबाद गुजरात, **सदस्य**
३. डॉ. चंद्रकांत बाविस्कर, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, **सदस्य**
४. डॉ. निशा वळवी, सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, **सदस्य**
५. डॉ. चेतना सोनकांबळे, श्री. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, **सदस्य**
६. डॉ. चेतना कामळस्कर, संचालक व प्राध्यापक, विज्ञान विद्याशाखा, **सदस्य**
७. डॉ. प्रविण घोडेस्वार, प्राध्यापक, विद्यार्थ्री सेवा विभाग, **सदस्य**
८. डॉ. लतिका गायकवाड, सहयोगी प्राध्यापक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा, **सदस्य**
९. डॉ. शुभांगी पाटील, सहायक प्राध्यापक, विद्यार्थ्री सेवा विभाग, **सदस्य**
१०. प्रा. विजयकुमार पाईकराव, सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, **सदस्य सचिव**
११. डॉ. दयाराम पवार, सहायक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, **सदस्य**
१२. डॉ. सुभाष सोनुने, सहायक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, **सदस्य**
१३. डॉ . राजकुमार ननवरे, शैक्षणिक संयोजक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, **निमंत्रित सदस्य**
१४. श्रीम. स्नेहल मांजरेकर, शैक्षणिक संयोजक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, **निमंत्रित सदस्य**
१५. श्रीम. वर्षा बहिरम, शैक्षणिक संयोजक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, **निमंत्रित सदस्य**
१६. डॉ. साधना लामतुरे, शैक्षणिक संयोजक, दिव्यांग अध्ययन केंद्र, **निमंत्रित सदस्य**
१७. श्री. ज्ञानेश्वर जाधव, शैक्षणिक संयोजक, दिव्यांग अध्ययन केंद्र, **निमंत्रित सदस्य**
१८. श्री. शिवानंद कहाळेकर, शैक्षणिक संयोजक, दिव्यांग अध्ययन केंद्र, **निमंत्रित सदस्य**

**काही कारणास्तव खालील सदस्य बैठकीस उपस्थित राहू शकले नाहीत.**

१. डॉ. भरतभाई जोशी, कुलगुरु, युनिव्हर्सिटी ऑफ गुजराथ विद्यापीठ, गुजरात, **सदस्य**
२. प्रा. संजय चाकणे, तुलाराम महाविद्यालय, पुणे, **सदस्य**

सदरच्या बैठकीमध्ये ठेवण्यात आलेले विषय व सर्वानुमते घेतलेले निर्णय पुढीलप्रमाणे.

| क्रमांक | विषय |
|---|---|
| 64. | **उपस्थित सदस्यांचे स्वागत : मा. संचालक, प्रा. संजीवनी महाले** |
| 64.01 | **विषय क्र. बी.-1/एफ-183/ 2025/ 01**<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्र. ६३ च्या इतिवृत्तास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>**(सहपत्र १)** |
| 64.02 | **विषय क्र. बी.-1/एफ-183/ 2025/ 02**<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्र. ६३ च्या कार्यवाही अहवालाची माहिती देण्यात आली व कार्यवाही अहवालास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. **(सहपत्र २)** |
| 64.03 | **विषय क्र. बी.-1/एफ-183/ 2025/ 03**<br>**विषय : सेवातंर्गत बी.एड. प्रवेशाकरिता शैक्षणिक गुणांकनामध्ये महाराष्ट्रातील UGC मान्यता प्राप्त विद्यापीठांच्या Ph.D. पदवीधारकांसाठी अतिरिक्त गुणांचा समावेश करणेबाबत...**<br>**टिपणी :** आपल्या विद्यापीठातील सेवातंर्गत बी एड प्रवेशासाठी जे गुणांकन करण्यात येते. त्यात पदवी व पदव्युतर गुणांकनासाठी आपल्या विद्यापीठाप्रमाणे अन्य विद्यापीठाचे पदवी व पदव्युत्तर ग्राह्य धरण्यात येते परतु Ph.D. च्या गुणांकनासाठी केवळ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची Ph.D. ग्राह्य धरण्यात येते व महाराष्ट्रातील अन्य विद्यापीठाची Ph.D. ग्राह्य धरण्यात येत नाही. त्यामुळे संबंधित अर्हता प्राप्त करणाऱ्यांची आपल्या विद्यापीठात काही गुणाअभावी बी एड करण्याची संधी हुकते. तरी अशी उच्च अर्हता प्राप्त करणाऱ्या शिक्षकांना सेवातर्गत बी. एड. करण्याची योग्य संधी मिळावी म्हणून पुढील शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती आणि मा.आ.श्री. सत्यजित तांबे यांनी केलेल्या मागणीनुसार चर्चा ग्राह्य धरण्यात यावी किंवा कसे या चर्चा व निर्णयासाठी सादर... **(सहपत्र ३)**<br>**निर्णय :** मुक्त विद्यापीठातील आणि इतर पारंपारिक विद्यापीठातील पीएचडीधारकांना अतिरिक्त सहा गुण देण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली. परंतु विद्यार्थ्याला पीएचडी वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य असेल. |
| 64.4 | **विषय क्र. बी.-1/एफ-183/ 2025/ 04**<br>**विषय : बी.एड. शिक्षणक्रमाच्या PPR ला मान्यता मिळणेबाबत..**<br>**टिपणी :** बी.एड. सेवांतर्गत शिक्षणक्रमाच्या शैक्षणिक वर्ष 2025-27 साठी UGC DEB च्या मान्यतेस्तव PPR तयार करण्यात आलेला आहे. तरी या सुधारित PPR ला मान्यता मिळावी ही विनंती. **(सहपत्र ४)**<br>**निर्णय :** UGC DEB ची बी.एड शिक्षणक्रमाची मान्यता घेण्यासाठी विकसित करण्यात आलेल्या PPR FORM ला मान्यता देण्यात आली. |

| | |
|---|---|
| 64.5 | **विषय क्र.बी.-1/एफ-183/2025/05**<br>**विषय : बी.एड. शिक्षणक्रमाच्या स्वयं-अध्ययन साहित्याला मान्यता मिळण्याबाबत...**<br>**टिपणी** : बी.एड. शिक्षणक्रमाच्या स्वयं-अध्ययन साहित्याची निर्मिती शिक्षणशास्त्र विद्याशाखेकडून वेळोवेळी विहित समितीच्या मार्गदर्शन व मान्यतेनुसार केली आहे. UGC-DEB ला स्वयं-अध्ययन साहित्याला मान्यता आवश्यक असते. त्यास कार्योत्तर मान्यतेसाठी विषय सादर...<br>**(सहपत्र ५)**<br>**निर्णय** : बी.एड. शिक्षणक्रमाच्या अध्ययन साहित्याला कार्योत्तर मान्यता देण्यात आली. |
| 64.6 | **विषय क्र. बी.-1/एफ-183/2025/06**<br>**विषय : बी.एड. शिक्षणक्रम पालघर जिल्हा अभ्यासकेंद्र मान्यतेबाबत..**<br>**टिपणी** : ठाणे जिल्ह्यातून नव्याने निर्माण झालेल्या पालघर जिल्ह्यासाठी तेथील प्राथमिक शिक्षकांच्या विनंती वरून या DEEP CAMPUS, BOISAR A.G.S COLLEGE OF EDUCATION BOISAR DIST. PALDHAR या केंद्रास मान्यता देण्यात आलेली आहे. कार्योत्तर मान्यतेसाठी विषय सादर...<br>**निर्णय** : DEEP CAMPUS, BOISAR A.G.S COLLEGE OF EDUCATION BOISAR DIST. PALDHAR या अभ्यासकेंद्रास मान्यता देण्यात आली. |
| 64.7 | **विषय क्र. बी.-1/एफ-183/ 2025/ 07**<br>**विषय : बी.एड. विशेष शिक्षण (HI/VI/ID) शिक्षणक्रम (P-21) अध्ययन साहित्य विकसित करणे बाबत...**<br>**टिपणी** : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ व भारतीय पुर्नवास परिषद, (RCI) नवी दिल्ली यांच्या सामंजस्य करारानुसार सदर शिक्षणक्रम विद्यापीठाअंतर्गत सन २०१५ पासून कार्यान्वित केला जातो. बी.एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रमाचा नव्याने पाठ्यक्रम RCI ने संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेला आहे. सदर शिक्षणक्रम कार्यान्वित करण्याबाबतचे परिपत्रक किंवा पत्र RCI द्वारे मुक्त विद्यापीठांना पाठविण्यात आलेले नाही. तरी मात्र मुक्त विद्यापीठाला अध्ययन साहित्य तयार करण्यास पुरेसा कालावधी देणे आवश्यक असल्याने मुक्त विद्यापीठ अध्ययन साहित्य तयार करण्याचे कार्य हाती घेऊ इच्छिते. शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेपुढे सदर विषय चर्चा व तत्वत्तः मान्यतेसाठी सादर ...<br>**निर्णय** : **RCI** ने दिलेल्या बी.एड विशेष शिक्षण अध्ययन साहित्य विकसनासाठी मान्यता देण्यात आली. परिपत्रक प्राप्त झाल्यानंतर तज्ञ सल्लागार पाठ्यक्रम विकसनासाठी बैठक घेण्यात येईल. |
| 64.08 | **विषय क्र. बी.-1/एफ-183/ 2025/ 08**<br>**विषय: बी.एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रम अभ्यासकेंद्र निकषांबाबत...**<br>**टिपणी** : बी.एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रमाचे अभ्यासकेंद्र सुरुळीत कार्यान्वित करण्यासाठी भारतीय पुर्नवास परिषद (RCI) नवी दिल्ली आणि विद्यापीठाने काही निकष ठरवून दिलेले आहेत. त्याअनुषंगाने सदर शिक्षणक्रमाच्या अभ्यासकेंद्राचे निकष तयार करण्यात आलेले आहेत. शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेपुढे सदर विषय चर्चा व मान्यतेसाठी सादर... **(सहपत्र ६)**<br>**निर्णय** : बी.एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रम अभ्यासकेंद्र मान्यता निकषांस मान्यता देण्यात आली. |

| | |
|---|---|
| 64.09 | **विषय क्र. बी.-1/एफ-183/ 2025/ 09**<br>**विषय : समावेशित शिक्षणासाठी क्रॉस डिसॅबिलिटी शीघ्र हस्तक्षेपण प्रमाणपत्र शिक्षणक्रम सुरु करणेबाबत...**<br>**टिपणी** : बी. एड. विशेष शिक्षण (HI/VI/ID) शिक्षणक्रमाची दि. ३ जानेवारी २०२५ रोजी उच्च तज्ञ सल्लागार समितीची बैठक विद्यापीठात घेण्यात आली. त्या बैठकी दरम्यान विद्यापीठ प्रतिनिधी डॉ. वर्षा गट्टू यांनी **समावेशित शिक्षणासाठी क्रॉस डिसॅबिलिटी शीघ्र हस्तक्षेपण प्रमाणपत्र शिक्षणक्रम सुरू करावा असे सुचविले आहे. त्याच बरोबर** RCI द्वारे 7-91 / Prog. (Policy) /RCI/2024/8272 Dated: 20.09.2024 नुसार संस्था अथवा विद्यापीठ विशेष शिक्षणातील शिक्षणक्रम विकसित करू इच्छित असल्यास RCI कडे प्रस्ताव सादर करण्यास निर्देशित केलेले आहे. विद्यापीठातील शिक्षणशास्त्र विद्याशाखेअंतर्गत दिव्यंग अध्ययन केंद्रामार्फत सदर शिक्षणक्रमाची तज्ञ सल्लागार समिती, पाठ्यक्रम समिती, गठित करून शिक्षणक्रम संरचना तयार करून RCI कडे मान्यतेसाठी सादर करण्यात आलेले आहे. सदर बाबींसाठी मा.कुलगुरूंची मान्यताही घेण्यात आलेली आहे. शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेपुढे सदर विषय कार्योत्तर मान्यतेसाठी सादर ... **(सहपत्र ७)**<br>**निर्णय :** दिव्यांग अध्ययन केंद्रामार्फत समावेशित शिक्षणासाठी क्रॉस डिसॅबिलिटी शीघ्र हस्तक्षेपण प्रमाणपत्र शिक्षणक्रम सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. |
| 64.10 | **विषय क्र. बी.-1/एफ-183/ 2025/ 010**<br>**विषय : समावेशीत शिक्षण आणि अध्ययन अक्षमता प्रमाणपत्र शिक्षणक्रम पाठ्यक्रम व लेखक संपादक समिती बाबत...**<br>**टिपणी** : समावेशीत शिक्षण आणि अध्ययन अक्षमता प्रमाणपत्र शिक्षणक्रमासाठी शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्र.६०.व्या बैठकीत शिक्षणक्रम संरचना व अभ्यासक्रमांना मान्यता देण्यात आलेली आहे. संबंधित अभ्यासक्रमांचे पाठ्यक्रम विकसन व घटक लेखन कार्य करावयाचे आहे, तरी सदर शिक्षणक्रमाच्या पाठ्यक्रम व लेखक समितीस मा. कुलगुरू यांची मान्यता घेण्यात आलेली आहे. समिती सदस्यांची नावे सोबत जोडण्यात आलेले आहे. लेखक समितीच्या नावांमध्ये गरजेनुसार काही नवीन तज्ज्ञांची नावे सुचविण्यास शिक्षणशास्त्र विद्याशाखाच्या मा. संचालकाकडे अधिकार राहतील. सदर विषय परिषदेपुढे चर्चा व मान्यतेसाठी सादर ... **(सहपत्र ८)**<br>**निर्णय :** समावेशित शिक्षण आणि अध्ययन अक्षमता प्रमाणपत्र शिक्षणक्रम पाठ्यक्रम व लेखक संपादक समितीस मान्यता देण्यात आली. लेखक समितीच्या नावांमध्ये गरजेनुसार काही नवीन तज्ज्ञांची नावे सुचविण्यास शिक्षणशास्त्र विद्याशाखाच्या मा. संचालकाकडे अधिकार राहतील. |
| 64.11 | **विषय क्र. बी.-1/एफ-183/ 2025/ 011**<br>**विषय : उच्च शिक्षण पदविका शिक्षणक्रम तज्ञ सल्लागार समितीमध्ये आणखी एका तज्ञ सल्लागाराचे नाव समाविष्ट करण्यास मान्यता मिळणेबाबत...**<br>**टिपणी** : शिक्षणशास्त्र विद्याशाखे मार्फत उच्च शिक्षण पदविका हा नवीन शिक्षणक्रम (Diploma in Higher Education) NEP 2020 च्या धर्तीवर सुरु करणेबाबत शिक्षणशास्त्र विद्याशाखा बैठक क्र.६०, विषय : क्र. ६०.१७.०५ दिनांक २७ .५ .२०२४ व विद्वत परिषद बैठक क्र.६३ दिनांक २८ .५ .२०२४ ची मान्यता घेण्यात आलेली आह. या नंतर सदरहू शिक्षणक्रमासाठी |

| | |
|---|---|
| | दिनांक ०५.०७.२०२४ रोजी मा. कुलगुरू यांनी तज्ज्ञ सल्लागार समितीस मान्यता दिलेली आहे. या तज्ज्ञ सल्लागार समितीमध्ये प्रा. व्ही बी गायकवाड , विभागीय संचालक पुणे विभाग यांचे नाव नव्याने दि. ३०.०१ .२०२५ समाविष्ट केलेले आहे. या तज्ज्ञ सल्लागार समितीस शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेपुढे चर्चा व मान्यतेसाठी सादर .... **(सहपत्र ९)**<br>**निर्णय :** डॉ. व्ही. बी. गायकवाड यांचे नाव उच्च शिक्षण पदविका शिक्षणक्रमाच्या तज्ञ सल्लागार समितीमध्ये समाविष्ट करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| 64.12 | **विषय क्र. बी.-1/एफ-183/ 2025/ 012**<br>**विषय: संभाषणात्मक इंग्रजी प्रमाणपत्र शिक्षणक्रम (Certificate Programme in Communicative English) ला मान्यता मिळणेबाबत**<br>**टिपणी** : शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत NEP 2020 च्या धर्तीवर सेवांतर्गत शिक्षकांसाठी तसेच उच्च माध्यमिक परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यांसाठी 'संभाषणात्मक इंग्रजी प्रमाणपत्र शिक्षणक्रम (Certificate Programme in Communicative English)' सुरु करण्यासाठी शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेपुढे चर्चा व मान्यतेसाठी सादर.... **(सहपत्र १०)**<br>**निर्णय :** सेवांतर्गत शिक्षक आणि उच्च माध्यमिक परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी संभाषणात्मक इग्रजी प्रमाणपत्र शिक्षणक्रम (Certificate Programme in Communicative English) सुरु करण्यास सर्वानुमाते मान्यता देण्यात आली. |
| 64.13 | **विषय क्र. बी.-1/एफ-182/ 2025/ 13**<br>**विषय : वसंत ठकार फाउंडेशनतर्फे मतीमंद (दिव्यांग) मुलांना समाजाच्या प्रवाहात आणण्यासाठी मनुष्यबळ निर्मितीसाठी १०,००,००,०००/- (दहा कोटी) देणगी स्वरुपात स्वीकारणेबाबत.**<br>**टिपणी** :श्री वसंत ठकार ह्यांनी मतीमंद (दिव्यांग) क्षेत्रात भरीव कार्य केलेले आहे. ते ८८ वर्षांचे आहेत. त्यांचे हे कार्य भविष्यात सुरु राहण्यासाठी त्यांनी आपल्या विद्यापीठाकडे देणगी देण्यापूर्वी १३.१२.२०२४ रोजी विद्यापीठाच्या पुणे विभागीय केंद्रास भेट देऊन त्यांची इच्छा दर्शविली. डॉ. व्ही. बी. गायकवाड, विभागीय संचालक, पुणे यांनी त्यांच्या इच्छेचा आदर करून मा. कुलगुरूंना पत्र देण्यास सांगितले. त्यानुसार मा. कुलगुरूंना वसंत ठकार फाउंडेशनकडून दिनांक १८.१२.२०२४ रोजी मतीमंद (दिव्यांग) मुलांसाठी उपक्रम सुरु करण्यासाठी दहा कोटी देणगी स्वरुपात देण्याबाबतचे पत्र दिलेले होते. देणगी देण्याबाबत त्यांनी कोणत्याही अटी घातलेल्या नाहीत. परंतु त्यांच्याबरोबर औपचारिक करारनामा करण्यात येईल. याबाबत वित्त समिती बैठक क्र.१९ आणि व्यवस्थापन मंडळाची बैठक क्र.२०० व्या मध्ये सदर देणगी निधी विद्यापीठात घेण्यास मान्यता मिळालेली आहे. तरी ह्या निधीतून विद्यापीठामार्फत दिव्यांगाच्या पुर्नवसन केले जाईल. मात्र हे कार्य करण्यासाठी मा.कुलगुरू आणि मा.संचालक, दिव्यांग अध्ययन केंद्र यांच्या मार्गदर्शनाखाली प्रमाणित कार्यपद्धती निश्चित केली जाईल. त्यानुसार हे कार्य करण्यात येईल<br>**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर :**<br>१) मुक्त विद्यापीठामार्फत वसंत ठाकर फाउंडेशन कडून मिळालेल्या निधीतून दिव्यांग क्षेत्रात कार्य करण्यासाठी सदर विषय कार्योत्तर मान्यतेस्तव सादर.<br>२) शिक्षणशास्त्र विद्याशाखे अंतर्गत कार्यान्वित असलेले दिव्यांग अध्ययन केंद्र मिळालेल्या |

| | |
|---|---|
| | देणगीतून दिव्यांग क्षेत्रात कार्य करण्यासाठी प्रमाणित कार्यपद्धती (SOP) विकसित करण्यासाठी सदर विषय चर्चा आणि मान्यतेस्तव सादर... **(सहपत्र ११)**<br>**निर्णय :**<br>१) वसंत ठकार फाउंडेशनतर्फे मतीमंद (दिव्यांग) मुलांना समाजाच्या प्रवाहात आणण्यासाठी मनुष्यबळ निर्मितीसाठी १०,००,००,०००/- (दहा कोटी) देणगी स्वरुपात स्वीकारण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>२) विद्यापीठाला मिळालेल्या निधीतून दिव्यांग क्षेत्रात कार्य करण्यासाठी SOP तयार करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| 64.14 | **विषय क्र. बी.-1/एफ-182/ 2025/14**<br>**विषय : शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत कार्यान्वित असलेल्या विविध शिक्षणक्रमाच्या संमत्रक पात्रतेबाबत....**<br>**टिपणी :** मा. संचालक डॉ. सुभाष सोनुने विभागीय केंद्र अमरावती यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार आपल्या शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत कार्यान्वित असलेल्या विविध शिक्षणक्रमांच्या संमंत्रक पात्रतेची माहिती सोबतच्या सहपत्रानुसार आहे. त्यास कार्योत्तर मान्यतेसाठी विषय सादर...<br>**(सहपत्र १२)**<br>**निर्णय :** शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत कार्यान्वित असलेल्या विविध शिक्षणक्रमाच्या संमंत्रक पात्रतेस सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| 64 | **मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळीचे विषय** |
| 64.15 | **विषय क्र. बी.-1/एफ-182/ 2025/ 15**<br>**विषय : सेवांतर्गत बी.एड. शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांना समाजसेवा प्रात्यक्षिका अंतर्गत नवीन प्रात्यक्षिक समाविष्ट करणेबाबत.**<br>**टिपणी :** शिक्षणशास्त्र विद्याशाखेचे माजी संचालक मा. प्रा. अनंत जोशी ह्यांनी गीतेतील निवडक श्लोकांच्या आधारे द्विशतपदी भगवद गीता यातील अध्याय व त्यातील श्लोक घेऊन त्या श्लोकाचा मराठी भावानुवाद असे पुस्तकाचे विकसन केलेले आहे. त्यांनी हे पुस्तक बी.एड. सेवांतर्गत शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांना समाजसेवा प्रात्यक्षिकाअंतर्गत प्रात्यक्षिक कार्य म्हणून घेण्याबाबतचे पत्र संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांना दिलेले आहे. समाजसेवा प्रात्यक्षिक कार्यात समावेश करण्यासाठी शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेसमोर सदर विषय चर्चा आणि मान्यतेस्तव सादर... **(सहपत्र १३)**<br>**निर्णय :** सेवांतर्गत बी.एड. शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांना समाजसेवा प्रात्यक्षिकाअंतर्गत वरील प्रात्यक्षिकाचा समावेश करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| 64.16 | **विषय क्र. बी.-1/एफ-182/ 2025/ 16**<br>**विषय : एम.ए. शिक्षणशास्त्र (M83) शिक्षणक्रमातील सत्र ३ (EDU606) संशोधन कृती सत्र ४ मध्ये सादर करणेबाबत.**<br>**टिपणी :** शिक्षणशास्त्र विद्याशाखेकडून एम.ए. शिक्षणशास्त्र (M83) शिक्षणक्रमात सत्र ३ (EDU606) संशोधन कृतीमध्ये संशोधन आराखडा, दोन शोधनिवंध आढावा आणि संशोधन कार्यवाही वेळापत्रक असा तीन कृती पूर्ण करणे अपेक्षित होते. सत्र ४ मध्ये संशोधन कार्यवाही, |

| | |
|---|---|
| | शोधनिबंध, शोधगंगावरील पाच संशोधन अहवालांचा आढावा, संशोधन अहवाल सादर करणे अशा कृती करणे अपेक्षित आहे. परंतु सत्र ३ (EDU606) मध्ये संशोधन विषय मान्य नसल्यास विद्यार्थी सत्र ४ (EDU613) च्या कृती करू शकत नाही. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांनी सत्र ३ (EDU606) मधील कृती पूर्ण केलेल्या नसतील त्यांना सत्र ३ (EDU606) कृती पूर्ण केल्यानंतरच सत्र ४ (EDU613) मधील कृती सादर करण्यास मा. कुलगुरूंची मान्यता घेण्यात आलेली आहे. शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेसमोर सदर विषय चर्चा आणि मान्यतेस्तव सादर... <br> **(सहपत्र १४)** <br> **निर्णय :** एम.ए. शिक्षणशास्त्र (M83) शिक्षणक्रमाच्या सत्र ३ (EDU606) च्या संशोधन कृती यशस्वीरीत्या पूर्ण झाल्यानंतरच विद्यार्थ्यांना सत्र ४ (EDU613) च्या कृतींचे मूल्यमापन करण्यास कार्योत्तर मान्यता देण्यात आली. |

शेवटी विजयकुमार पाईकराव यांनी सर्वांचे आभार मानले आणि सहविचार बैठक संपल्याचे अध्यक्षांच्या परवानगीने सांगण्यात आले.

**प्रा. विजयकुमार पाईकराव**
सचिव, शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद

**प्रा. संजीवनी महाले**
अध्यक्ष, शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद
तथा संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा

मा. कुलगुरू, कृपया मान्यतेसाठी सविनय सादर.

**मान्य / अमान्य**

**मा. कुलगुरु**